# जाहिरात

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०२२/ प्र.क्र.९४/ का-६, दिनांक ०२ फेब्रूवारी, २०२३ नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) सातारा पश्चिम या प्रकल्पांतर्गत रिक्त असलेली अंगणवाडी मदतनिस यांची मानधनी पदे सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागणी करण्यात येत आहे. शहरनिहाय रिक्त पदसंख्या पुढीलप्रमाणे-

| अ. क्र. | शहराचे नाव | रिक्त मदतनीस पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | सातारा | ४९ |
| २ | खंडाळा | ०३ |
| ३ | लोणंद | ०३ |
| ४ | वाई | ०२ |
| ५ | महाबळेश्वर | ०१ |
| ६ | फलटण | ०१ |
| | एकुण | ५९ |

**अंगणवाडी मदतनिस या मानधनी पदाच्या सरळ नियुक्ती संदर्भात आवश्यक शैक्षणिक पात्रता अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत-**

| अ. क्र. | तपशिल | अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | पदाचे नांव | अंगणवाडी मदतनिस (मानधनी सेवा) |
| २ | मानधन | अंगणवाडी मदतनिस एकत्रित मानधन दरमहा रुपये ५५००/- |
| ३ | शैक्षणिक पात्रता | अंगणवाडी मदतनिस पदासाठी किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) शैक्षणिक अर्हता आवश्यक राहील. शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेच्या आवश्यक कागदपत्रांच्या व गुणपत्रकांच्या सत्यप्रती सोबत जोडाव्यात. |
| ४ | वास्तव्याची (स्थानिक रहिवाशी असणे) अट | ज्या नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रात मदतनिस पद रिक्त आहे (सातारा, खंडाळा, लोणंद, वाई, महाबळेश्वर, फलटण) त्या नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांना पात्र समजण्यात येईल. स्थानिक रहिवाशी असलेबाबत शासनाने निश्चित केलेला पुरावा सोबत जोडणे आवश्यक आहे. (आधारकार्ड / रेशनकार्ड / तहसीलदार यांचे डोमीसाईल सर्टीफिकेट / रहिवाशी प्रमाणपत्र सत्यप्रत जोडावी.)<br>तसेच उमेदवारांनी संबंधीत नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रातील रहिवाशी असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सोबत जोडण्यात यावे. |
| ५ | वयाची अट | जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल ३५ वर्षे आणि विधवा उमेदवारांसाठी वयोमर्यादा कमाल ४० वर्षे राहील. (जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / दहावी प्रमाणपत्र) |

| | | |
|---|---|---|
| ६ | लहान कुटूंब | १.उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये असावीत.<br>२.उमेदवाराला दोन हयात अपत्यापेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतून तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल. तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) असून देखील तिसरे अपत्य झाल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| ७ | भाषेचे ज्ञान | ज्या अंगणवाडी केंद्राकरीता अंगणवाडी मदतनिसची नियुक्ती करावयाची आहे अशा अंगणवाडीमध्ये ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उर्दु, हिंदी इ. पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर तेथील अंगणवाडीमध्ये मदतनिस पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्या (लिहीता व वाचता येणे) उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल. तथापि अशा उमेदवाराने इयत्ता १० वी किंवा १० वी पेक्षा जास्त शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील. |
| ८ | विधवा / अनाथ उमेदवारांबाबत | विधवा किंवा अनाथ उमेदवार असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. (सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक) |
| ९ | बदली | अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे अर्जदार स्थानिक रहीवाशी असावी. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचाऱ्यांना बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही. |
| १० | प्रवर्ग | अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / अर्थिकदृष्टया दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग या उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडावी. |
| ११ | अनुभव | शासकीय यंत्रणेतील एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडी सेविका / मदतनिस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडावे. (सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडावी.) |
| १२ | जाहिरात प्रसिध्दी | १६/०६/२०२३ |
| १३ | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक - ३०/०६/२०२३ सायं. ०६.१५ पर्यंत अर्ज दिनांक ३०/०६/२०२३ सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. अंतिम दिनांकानंतर आलेल्या किंवा डाकेद्वारे (पोस्टाद्वारे) विलंबाने पोहचलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.<br>अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण- बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय (नागरी) सातारा पश्चिम, केदार बिल्डींग, पहिला मजला, हॉटेल ग्रीन फील्ड शेजारी, उत्तेकर नगर, सदर बझार, सातारा ४१५००१ दुरध्वनी क्रमांक - ०२१६२- २२६१२८ |

| | | |
|---|---|---|
| १४ | प्राथमिक यादी | अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या दिनांकापासून १५ दिवसात कार्यालयाचे नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| १५ | यादीस हरकती | यादीतील कोणत्याही उमेदवाराचे प्रमाणपत्र व त्याबाबतचे दिलेले गुण याबाबत तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी, प्राथमिक यादी कार्यालयात/नोटीस बोर्डवर प्रसिध्द झाल्यापासून पुढील १० दिवसात बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) सातारा पश्चिम यांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार करता येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही. |
| १६ | प्रतिक्षा यादी | जर उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांपर्यंत रूजू झाला नाही किंवा त्यास अपात्र ठरविण्यात आले, तर प्रतिक्षा यादीतील उमेदवारास गुणानुक्रमानुसार नियुक्ती देण्यात येईल व सदर प्रतिक्षा यादी जाहीर झाल्यापासून एक वर्षापर्यंत वैध राहील. |
| १७ | निवड प्रक्रिये विरूध्द तक्रार / अपिल | निवडी संदर्भात कोणत्याही उमेदवाराची त्याच्यावर अन्याय झाल्याची तक्रार असल्यास निवड यादी घोषित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मा. विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे तक्रार दाखल करता येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही. |
| १८ | कागदपत्रांच्या प्रती | अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रती सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकीत केलेल्या असाव्यात. (साक्षांकन राजपत्रीत अधिकारी किंवा माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक किंवा प्राचार्य किंवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचे असावे.) |
| १९ | अर्ज | १. जाहिरातीमध्ये दिलेल्या विहित नमुन्यात अर्ज करावा. (अर्जात खाडाखोड/गिरवागिरव करू नये. तसेच व्हाईटनरचा उपयोग करू नये असे अर्ज रदद करण्यात येतील.) अर्ज सादर करतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडावी. अर्ज सादर केलेनंतर कोणतेही कागदपत्र/प्रमाणपत्र घेतले जाणार नाही.<br>२. उमेदवाराने विवाहापुर्वीचे नाव व विवाहानंतरचे नाव या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असल्याबाबत राजपत्र किंवा रु. १००/- चे स्टॅम्प पेपर वरील प्रतिज्ञापत्र यापैकी एक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.<br>३. अर्जदाराने नियुक्ती करीता कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.<br>४. अंतिम दिनांकानंतर आलेल्या किंवा डाकेद्वारे (पोस्टाद्वारे) विलंबाने पोहचलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.<br>५. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराला निवड झालेबाबत कळविण्यात येईल. इतर उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.<br>६. अंगणवाडी मदतनिस यांना शासन नियमानुसार दरमहा मानधन देय आहे. शासकीय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवेळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहील. मात्र मानधना व्यतिरिक्त |

| | | |
|---|---|---|
| | | कोणत्याही प्रकारचे भत्ते सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत.<br>७. अंगणवाडी मदतनिस हे एकत्रित मानधनावरील मानधनी स्वरूपाचे पद आहे. सदर पदास बदली, सेवानिवृत्ती वेतन, वेतनवाढ इ. शासकीय सवलती अनुज्ञेय नाहीत. |
| २० | निवड प्रक्रिया | शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराच्या शैक्षणिक गुण पत्रिकेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे ७५ गुण (१२ वी, पदवीधर, पदव्युत्तर, डी.एड., बी.एड., एम.एस.सी.आय.टी. यांचे एकत्रित कमाल ७५ गुण) व अतिरिक्त २५ गुण (विधवा/अनाथ- १० गुण, अनुसूचित जाती/जमाती- १० गुण, इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / अर्थिकदृष्टया दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग- ०५ गुण, अंगणवाडी सेविका/मदतनिस पदाचा ०२ वर्ष अनुभव असल्यास- ०५ गुण) |
| २१ | पत्र व्यवहार | भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सुचना जाहिरातीत नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे असतील. सुधारित सुचना असल्यास वेळोवेळी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येतील. |
| २२ | सेवासमाप्तीसाठी वयाची अट | सदर जाहिरातीव्दारे नियुक्त होणाऱ्या अंगणवाडी मदतनिस यांची सेवा वयाची ६० वर्ष पुर्ण होईपर्यंत वा त्या शारीरिकदृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत सुरू राहील. |

अंगणवाडी मदतनिसची भरतीप्रक्रीया ही महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६ दिनांक ०२ फेब्रूवारी, २०२३ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येईल.

(दीपक ढेपे)
बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) सातारा पश्चिम

# अर्जाचा नमुना

| उमेदवाराचा फोटो या चौकोनात चिकटवावा |
|---|

प्रति,
बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) सातारा पश्चिम.

| उमेदवाराची स्वाक्षरी |
|---|

विषय - अंगणवाडी मदतनिस पदाकरीता अर्ज सादर करणेबाबत..
संदर्भ - दैनिक वृत्तपत्र ................ मधील दि. १६/०६/२०२३ ची जाहिरात

महोदय,

मी खाली सही करणार ........................ नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रातील रहिवाशी असून, सदर नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रातील अंगणवाडी मदतनिस पदाकरीता अर्ज करू ईच्छित आहे. त्यासाठी मी माझी संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

१) विवाहापुर्वीचे संपुर्ण नाव - ........................

२) विवाहानंतरचे संपुर्ण नाव - ........................

३) जन्मतारीख - अंकी -

अक्षरी - ........................

४) जाहीरातीच्या दिनांकास वय वर्ष ........ महिने ........ दिवस ........

५) जात व प्रवर्ग - ........................

६) रहिवाशी संपूर्ण पत्ता - ........................

७) उमेदवार स्थानिक रहिवाशी आहे/नाही - ........................

८) उमेदवार विवाहीत/अविवाहीत आहे- ........................

९) हयात अपत्यांची संख्या ................ शेवटच्या मुलाचा जन्म दिनांक

१०) उमेदवारास दोन किंवा दोनपेक्षा कमी अपत्य असल्याचे प्रतिज्ञापत्र जोडले आहे/नाही-

११) उमेदवार विधवा/अनाथ मुलीपैकी आहे/नाही - ........................

१२) शैक्षणिक पात्रता-

| अ.क्र. | शिक्षण | वर्ष | शाळेचे/बोर्डाचे नांव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | इयत्ता दहावी | | | | |
| २. | इयत्ता बारावी | | | | |
| ३. | पदवीधर | | | | |
| ४. | पदव्यूत्तर | | | | |
| ५. | डी.एड. | | | | |
| ६. | बी.एड. | | | | |
| ७. | शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) | | | | |

१३) शासकीय अंगणवाडीतील सेविका/मदतनिस कमीत कमी २ वर्ष अनुभव आहे काय? -

१४) दुरध्वनी क्रमांक/भ्रमनध्वनी क्रमांक- ..............................

वरील संपूर्ण माहिती खरी असून ती चुकीची आढळल्यास माझा अर्ज फेटाळला जाईल किंवा माझी निवड झाल्यानंतरही माझी नियुक्ती कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती अधिकाऱ्यांना आहे याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच जर माझी अंगणवाडी मदतनिस म्हणून निवड झाल्यास बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) सातारा पश्चिम अंतर्गत नगरपरिषद निहाय देण्यात येणाऱ्या कोणत्याही अंगणवाडीवर मी काम करण्यास तयार आहे. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

(उमेदवाराची सही)

संपूर्ण नांव ..............

दिनांक - / /२०२३

# परिशिष्ट ब - लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

मी श्रीमती ..............................................................................................

श्री. ........................................................................ यांची पत्नी वय वर्ष ..........

राहणार ..............................................................................................

याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

१. मी ...................................... पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला खालीलप्रमाणे हयात मुले आहेत.

| अ. क्र. | मुलाचे/मुलीचे नांव | जन्मतारीख | वय |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| | | | |

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल किंवा भविष्यात दोनपेक्षा अधिक मुले झाल्यास,अंगणवाडी मदतनिस या मानधनी पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास किंवा सेवेतून कमी करण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

४. मला दोनपेक्षा जास्त मुले होणार नाहीत यासाठी मी कुटुंबनियोजन करून घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाण -

दिनांक - (नांव व सही)

**अर्जासोबत जोडावयाची साक्षांकीत केलेली कागदपत्रे -**

१) उमेदवाराने विवाहापुर्वीचे नाव व विवाहानंतरचे नाव या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असल्याबाबत राजपत्र सत्यप्रत किंवा रु. १००/- चे स्टॅम्प पेपर वरील प्रतिज्ञापत्र यापैकी एक

२) जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / दहावी प्रमाणपत्र याची साक्षांकीत प्रत

३) उमेदवार अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / अर्थिकदृष्टया दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग मधील असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

४) आधारकार्ड / रेशनकार्ड / तहसीलदार यांचे डोमीसाईल सर्टीफिकेट / रहिवाशी प्रमाणपत्र सत्यप्रत

५) उमेदवार संबंधीत नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रातील रहिवाशी असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र

६) लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र

७) उमेदवार विधवा किंवा अनाथ असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र

८) इयत्ता १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष), पदवीधर, पदव्युत्तर, डी.एड., बी.एड., एम.एस.सी.आय.टी. गुणपत्रक व प्रमाणपत्र यांच्या साक्षांकीत प्रती

९) अंगणवाडी सेविका / मदतनिस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत